**नियमीत दिवाणी दावा क्र २१४/२०२३**
**संदीप वि भागवत**
**निशाणी क्र २७**

**१.** पुराव्यावरुन खालील दस्तऐवजांना निशाणी देण्यात येते;

१. ७/१२ उतारा, निशाणी ३१ ते ३८.

२. सर्व्हे रेकॉर्ड, निशाणी ३९.

३. एकत्रीत जमिनी दर्शविणारे पत्र, निशाणी ४०.

४. नकाशा, निशाणी ४१.

५. पोलीस तक्रार, निशाणी ४२.

६. खरेदीखत, निशाणी ४३.

**<u>वादीचा शपथेवर उलटतपास सुरु प्रतिवादी क्र १ व २ तर्फे वकील, श्री जी व्ही सावंत</u>**

**२.** माझे इयत्ता दहावी पर्यंत शिक्षण झाले आहे. पुर्ण गट क्रमांक ६७७ च्या पश्चिमेस ओढा आहे. वादमिळकत ही आमच्या कुटुंबाची मिळकत आहे. पूर्ण गट क्रमांक ६७७ च्या पुर्वेस प्रतिवादींचे गट क्रमांक ६७६ आहे. गट क्रमांक ६७६ च्या पूर्वेस गट क्रमांक ६७५ आहे. गट क्रमांक ६७५ ची जमीन गट क्रमांक ६७६ व ६७७ च्या दक्षिण बाजुला आहे. गट क्रमांक ६७५ च्या दक्षिणेस राष्ट्रीय महामार्ग आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट क्रमांक ६७७ च्या दक्षिणेकडे गट क्रमांक ६७५ चे क्षेत्र मी खरेदी केलेले आहे. प्रतिवादी क्र १ व २ यांनी गट क्रमांक ६७६ च्या दक्षिणेकडील गट क्रमांक ६७५ चे क्षेत्र खरेदी केलेले आहे. पुर्ण गट क्रमांक ६७७ अरण गावात आहे. गट क्रमांक ६७६ आणि ६७५ अरण गावात आहे किंवा कसे मला माहिती नाही. गट क्रमांक ८९ मध्ये माझी राहती वस्ती आहे आणि सदर गट क्रमांक ८९ मोडनिंब गावी आहे. गट क्रमांक ८९ मधून राष्ट्रीय राजमार्गास येण्याकरीता सरळ रस्ता आहे. प्रतिवादी क्र १ व २ यांनी त्यांच्या गट क्रमांक ६७६ व ६७५ च्या दक्षिणेस असलेले गट क्रमांक ८९ मधील क्षेत्र खरेदी केलेले आहे. प्रतिवादी क्र १ व २ यांनी त्यांचे गट क्रमांक ६७६, ६७५ आणि ८९ मधील पश्चिम कोपऱ्यातील क्षेत्र पेट्रोल पंपासाठी भाड्याने दिलेले आहे. गट क्रमांक ६७७ च्या पश्चिमेस असलेल्या ओढ्याच्या पश्चिमेस उत्तर-दक्षिण कुरणवस्तीकडे जाणारा रस्ता आहे. कुरणवस्तीकडे जाणाऱ्या रस्त्यावरुन संपूर्ण गट क्रमांक ६७७ च्या उत्तर-पश्चिम कोपऱ्यापर्यंत ओढ्यावर बंधारा आहे. सदर बंधाऱ्यावरुन

आम्ही गट क्रमांक ६७७ मध्ये येतो. साक्षीदार स्वतःहून पुढे सांगतो की, त्यावरुन पायी किंवा दुचाकी वाहनावरुन येता येते.

**३.** प्रतिवादींचे क्षेत्र बागायती आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादरस्ता केव्हाही अस्तित्वात नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, वादरस्त्यावर पेट्रोल पंप स्थित आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादरस्ता अस्तित्वात नसल्याने त्याठिकाणी पेट्रोल पंपाचे बांधकाम झालेले आहे. प्रतिवादी आणि पेट्रोल पंप मालकाचा करार सन २०१४ साली झाला. मी त्यावेळी वादरस्त्यासाठी कोणतीही हरकत घेतली नाही. हे म्हणणे खरे नाही की, गट क्रमांक ६७५ मधून मी राट्रीय राजमार्गावर येतो. हे म्हणणे खरे नाही की, गट क्रमांक ६७५ मधून राष्ट्रीय राजमार्गावर येत असल्याने वादी लोकांनी वादरस्त्यासाठी हरकत घेतली नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीं विरुद्ध खोटा दावा दाखल केला आहे.

**<u>प्रतिवादी क्र ३ व ४ तर्फे उलटतपास</u>**

**४.** प्रतिवादी व त्यांचे वकील गैरहजर. सबब, उलटतपास नाही.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

वाचून दाखवले बरोबर आहे,

JAIN AKHIL OMPRAKASH

Digitally signed by JAIN AKHIL OMPRAKASH
Date: 2024.08.08 13:06:29 +0530

(अखिल जैन)

दिनांक - ०८/०८/२०२४. दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर, माढा.